विधी व न्याय विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ जानेवारी १९९८

74

विधी सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७.

क्रमांक एलएबी. १८९५/३५९ (६४२)–२२.—विधी सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७ (१९८७ चा ३९) मधील कलम २८ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून व मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींशी विचारविनिमय करून महाराष्ट्र शासन खालील नियम करीत आहे :—

१. संक्षिप्त नाव व प्रारंभ.—(१) ह्या नियमांना महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण नियम, १९९८ असे म्हणावे.

(२) हे नियम दिनांक १४ जानेवारी १९९८ पासून अंमलात येतील.

२. व्याख्या.—या नियमांत संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "अधिनियम" म्हणजे विधी सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७ (१९८७ चा ३९);

(ब) "मुख्य न्यायमूर्ती" म्हणजे मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती;

(क) "जिल्हा प्राधिकरण" म्हणजे अधिनियमाच्या कलम ९ अन्वये स्थापन केलेले जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि त्यात बृहन्मुंबई विधी सेवा प्राधिकरण आणि बृहन्मुंबई उपनगर विधी सेवा प्राधिकरण यांचा समावेश होतो;

(ड) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन;

(इ) "उच्च न्यायालय विधी सेवा समिती" म्हणजे मुंबई उच्च न्यायालय, मुंबईचे प्रमुख पीठासन आणि त्याची सध्या कार्यरत असलेली नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठे आणि यापुढे महाराष्ट्र राज्यात कोठेही स्थापन होणारी खंडपीठे याकरिता गठित केलेली उच्च न्यायालय विधी सेवा समिती;

(फ) "अनुसूची" म्हणजे या नियमांना जोडलेली अनुसूची;

(ग) या नियमांत वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अधिनियमात अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील तेच त्यांचे अर्थ असतील.

३. कलम ६ च्या पोट-कलम (२) च्या खंड (क) अन्वये राज्य प्राधिकरणावरील इतर सदस्यांची संख्या, अनुभव आणि पात्रता :—

(१) राज्य प्राधिकरणावर मुख्य न्यायमूर्ती आणि कार्यकारी अध्यक्षांव्यतिरिक्त खालीलप्रमाणे पदसिद्ध सदस्य असतील :—

(एक) मंत्री, विधी व न्याय;

(दोन) महाराष्ट्राचे महाअधिवक्ता;

(तीन) शासनाचे मुख्य सचिव;

(चार) सचिव, विधी व न्याय विभाग;

IndiaCode

(पाच) सचिव, वित्त विभाग;

(सहा) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य;

(सात) अधिनियमाच्या कलम ६ च्या पोट-कलम (३) अन्वये नियुक्ती केलेला प्राधिकरणाचा सदस्य-सचिव;

परंतु, अधिनियमाच्या कलम ६ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकानुसार महाराष्ट्र राज्य कायदेविषयक सहाय्य व सल्ला मंडळाचा सचिव म्हणून सध्या कार्यरत असलेला अधिकारी हा पाच वर्षापेक्षा अधिक होणार नाही इतक्या कालावधीकरिता राज्य प्राधिकरणाचा सदस्य-सचिव असेल.

(२) शासन मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून १० पेक्षा जास्त संख्या नसेल इतक्या सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्ती करू शकेल ज्यामधील किमान अर्धी संख्या या नियमांच्या पोट-नियम (३) मध्ये विहित केलेला अनुभव आणि पात्रता असलेल्या स्त्रियांची असेल.

(३) कोणाही व्यक्तींची नामनिर्देशनाने राज्य विधी प्राधिकरणावर नियुक्ती केली जाऊ शकेल जर शासनाच्या मतानुसार अशी व्यक्ती—

(अ) समाजातील दुर्बल घटकासहित अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, स्त्रिया, मुले, ग्रामीण आणि नागरी कामगार ह्यांच्या उन्नतीकरिता झटणारा नामांकित कार्यकर्ता, किंवा

(ब) कायद्याच्या क्षेत्रात तज्ज्ञ असलेली व्यक्ती, किंवा

(क) विधी सेवा योजना राबविण्यामध्ये विशेष रस असणारी नामांकित व्यक्ती असेल.

४. कलम ६ च्या पोट-कलम (३) खालील राज्य प्राधिकरणाच्या सदस्य-सचिवांचे अधिकार व कर्तव्ये. —राज्य विधी प्राधिकरण व कार्यकारी अध्यक्ष ह्यांच्या सर्वसाधारण देखरेखीच्या अधीन राहून राज्य विधी प्राधिकरणाच्या सदस्य-सचिवाचे खालीलप्रमाणे अधिकार व कर्तव्ये असतील :—

(अ) पात्र आणि समाजातील दुर्बल घटकांकरिता मोफत कायदेविषयक सेवा आयोजित करणे;

(ब) राज्य प्राधिकरणाने मान्य केलेले कार्यक्रम आणि विधी सेवा योजनांचे आराखडे तयार करणे आणि त्याचे परिणामकारक संनियंत्रण आणि अंमलबजावणी होईल असे पाहणे;

(क) राज्य शासनातील विभाग प्रमुख म्हणून प्रशासन, दप्तरराखणी, वित्त आणि अंदाजपत्रकासंदर्भातील आपल्या अधिकारांचा वापर करणे;

(ड) राज्य विधी प्राधिकरणच्या मालमत्तेची, कागदपत्रांची आणि निधीची व्यवस्था करणे;

(ई) राज्य विधी प्राधिकरणाचे खरे व योग्य हिशोब ठेवण्याबाबत व्यवस्था करणे ज्यामध्ये नियतकालिक तपासणी आणि लेखापरीक्षा ह्यांचा अंतर्भाव असेल;

IndiaCode

(फ) राज्य विधी प्राधिकरणाचा वार्षिक आय व व्यय यांचा हिशेब आणि ताळेबंद तयार करणे ;

(ग) समाज कार्य संस्था आणि जिल्हा आणि तालुका विधी सेवा प्राधिकरणामध्ये समन्वय साधणे ;

(ह) निरनिराळ्या विधी सेवा कार्यक्रमांच्या अंमलबजावणीच्या प्रगतीची वेळोवेळी अद्ययावत आणि संपूर्ण आकडेवारी तयार ठेवणे ;

(आय) वित्त सहाय्याचे प्रस्ताव तयार करणे आणि त्यासंबंधीची उपयोजन प्रमाणपत्रे देणे ;

(जे) राज्य विधी प्राधिकरणाने मान्य केलेले आणि विधी सेवा कार्यक्रमाशी संबंधित असलेले विधी सेवा कार्यक्रम आयोजित करणे आणि विधी सेवा कार्यक्रमाशी संबंधित सभा, शिबिरे आणि कार्यशाळेचे आयोजन करणे आणि अहवाल तयार करणे व त्याचा पाठपुरावा करणे ;

(के) विधी सेवा कार्यक्रमांच्या विविध दृष्टिकोनांची सर्वसामान्य जनतेला माहिती होण्याकरिता व्हिडियो किंवा डॉक्युमेंटरी चित्रफिती, प्रसिद्धीसाहित्य, पुस्तिका आणि प्रकाशनांची निर्मिती करणे;

(ल) ग्रामीण तंटे सोडविण्यावर भर देणे आणि ग्रामीण जनतेच्या दारी ग्रामीण तंटे सोडविण्याकरिता परिणामकारक व अर्थपूर्ण विधी सेवा योजना आखण्याकरिता विशेष प्रयत्न करणे;

(म) अधिनियमाच्या कलम ४ च्या खंड (व) अन्वये तयार करण्यात आलेल्या योजनेप्रमाणे त्याला नेमून देण्यात येतील अशी कामे पार पाडणे ; आणि

(न) राज्य विधी प्राधिकरणाच्या कार्यक्षम कामकाजाकरिता इष्ट असतील अशी इतर कामे पार पाडणे.

५. कलम ६ च्या पोट-कलम (४) खालील राज्य विधी प्राधिकरणाच्या सदस्यांचा आणि सदस्य सचिवांचा पदावधी आणि त्यासंबंधातील इतर शर्ती :—

(१) नियम ३ च्या पोट-नियम (२) अन्वये राज्य विधी प्राधिकरणावर नामनिर्देशित केलेल्या सदस्यांची मुदत सर्वसाधारणपणे ३ वर्षांकरिता असेल आणि ते पुनर्नामनिर्देशनाकरिता पात्र असतील. ज्या सदस्याची मुदत संपली असेल तो नवीन सदस्यांची त्याच्या जागी नियुक्ती होईपर्यंत कार्यरत राहील.

(२) नियम ३ च्या पोट-नियम (२) अन्वये नामनिर्देशित केलेला राज्य विधी प्राधिकरणाचा सदस्य मुख्य न्यायमूर्तींना उद्देशून लिहिलेल्या पत्राद्वारे राजीनामा देऊ शकेल. राज्य शासनाच्या मते जर तो सदस्य राज्य विधी प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये पुरेशी आस्था दाखवित नसेल तर राज्य शासन त्याला काढूसुद्धा शकेल.

(३) नियम ३ च्या पोट-नियम (२) अन्वये राज्य विधी प्राधिकरणावर नामनिर्देशित केलेल्या सदस्याचे सदस्यत्व कोणत्याही कारणाने संपुष्टात आले तर रिक्त झालेले पद मूळ नामनिर्देशनाकरिता असलेल्या पद्धतीनेच भरले जाईल आणि अशाप्रकारे नामनिर्देशित झालेल्या व्यक्तीची मुदत पूर्वसदस्याच्या उर्वरित कालावधीपर्यंत राहील.

IndiaCode

(४) सदस्य जर सर्वोच्च न्यायालयाचा किंवा उच्च न्यायालयाचा विद्यमान किंवा सेवानिवृत्त न्यायमूर्ती असेल तर संबंधित न्यायालयाच्या विद्यमान न्यायमूर्तींना अनुज्ञेय असलेल्या नियमांनुसार प्रवासभत्ता व दैनिक भत्ता त्याला अनुज्ञेय असेल. इतर सदस्य जर विधानमंडळाचे विद्यमान सदस्य किंवा शासकीय कर्मचारी असतील तर त्यांना लागू असलेल्या नियमांनुसार प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल.

(५) नामनिर्देशित सदस्य जर शासकीय कर्मचारी असेल तर त्याला केवळ प्रवासभत्ता आणि दैनिक भत्ता त्याच्या मूळ विभागाकडून किंवा राज्य प्राधिकरणाकडून अनुज्ञेय होईल.

(६) सेवानिवृत्तीचे वय, वेतन आणि भत्ते, लाभ व हक्क आणि शिस्तविषयक बाबी यांसारख्या सर्व प्रकरणांमध्ये सदस्य सचिव त्याला लागू असलेल्या राज्य शासकीय नियमांच्या अधीन असतील.

६. कलम ६ च्या पोट-कलम (५) अन्वये राज्य विधी प्राधिकरणावर असलेल्या अधिकाऱ्यांची व इतर कर्मचाऱ्यांची संख्या :—

राज्य विधी प्राधिकरणावर अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आले आहेत एवढे अधिकारी व इतर कर्मचारी असतील.

७. कलम ६ च्या पोट-कलम (६) अन्वये राज्य विधी प्राधिकरणावर असलेले अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या शर्ती व वेतन आणि भत्ते :—

(१) राज्य विधी प्राधिकरणावर असलेल्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना राज्य शासनाच्या समतुल्य अधिकाऱ्यांसाठी व कर्मचाऱ्यांसाठी अनुज्ञेय असलेले वेतन आणि भत्ते मिळण्याचा हक्क असेल.

(२) सेवानिवृत्ती, वेतन आणि भत्ते, लाभ व हक्क आणि शिस्तविषयक बाबींसहित सर्व बाबींमध्ये राज्य विधी प्राधिकरणावरील अधिकारी आणि कर्मचारी राज्य शासनाच्या समतुल्य पदांवरील कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या शासकीय नियमांच्या अधीन असतील.

(३) राज्य विधी प्राधिकरणावरील अधिकारी आणि इतर कर्मचारी शासनाकडून वेळोवेळी अधिसूचित करण्यात येतील अशा इतर सोयी, भत्ते आणि फायदे मिळण्यास हकदार असतील.

८. कलम ८ अ च्या पोट-कलम (३) अन्वये उच्च न्यायालय विधी सेवा समितीच्या सदस्य सचिवाचा अनुभव व पात्रता :—

(१) उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त प्रबंधक दर्जापेक्षा कमी दर्जाचा अधिकारी असेल तर एखादी व्यक्ती उच्च न्यायालय विधी सेवा समितीच्या सदस्य सचिव पदासाठी पात्र असणार नाही.

(२) राज्य प्राधिकरण या अधिनियमाच्या कलम ८अ च्या पोट-कलम (१) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे अगोदरच कार्यरत असलेल्या मुंबई, नागपूर व औरंगाबाद ह्या प्रत्येक खंडपीठाकरिता वेगळया विधी सेवा समितीची स्थापना करील. तसेच ह्यापुढे महाराष्ट्रात जिथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ निर्माण होईल तेथेही उच्च न्यायालय विधी सेवा समितीची स्थापना करील.

IndiaCode

९. कलम ८ अन्वये पोट-कलम (५) आणि (६) अन्वये उच्च न्यायालय विधी सेवा समितीच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची संख्या व सेवाशर्ती आणि त्यांना देय असलेले वेतन व भत्ते :—

(१) प्रत्येक उच्च न्यायालय सेवा समितीमध्ये अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आले आहेत एवढे अधिकारी व इतर कर्मचारी असतील.

(२) उच्च न्यायालय विधी सेवा समितीच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना समतुल्य पद धारण करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांएवढे वेतन व भत्ते मिळण्याचा हक्क असेल.

(३) सेवानिवृत्तीचे वय, वेतन आणि भत्ते, लाभ व हक्क यासारख्या सर्व बाबींमध्ये आणि शिस्तविषयक बाबीसहित सर्व बाबींमध्ये उच्च न्यायालय विधी सेवा समितीचे अधिकारी आणि कर्मचारी शासनाची समतुल्य पदे धारण करणाऱ्या व्यक्तींना लागू असलेले शासकीय नियम लागू होतील.

(४) उच्च न्यायालय विधी सेवा समितीच्या अधिकाऱ्यांना आणि इतर कर्मचाऱ्यांना शासनाकडून वेळोवेळी अधिसूचित करण्यात येतील अशा इतर सोयी, भत्ते आणि फायदे मिळण्याचा हक्क असेल.

(५) अधिनियमाचे प्रकरण तीन महाराष्ट्र राज्यात अंमलात आणल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत शासनाने प्रत्येक उच्च न्यायालय विधी सेवा समितीला अनुसूचीत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अतिरिक्त कर्मचारीवर्गाची तरतूद करणे हे कायदेशीर असेल.

१०. कलम ९ च्या-पोट-कलम (२) मधील खंड (ब) अन्वये जिल्हा प्राधिकरणावरील सदस्यांची संख्या, अनुभव आणि पात्रता :—

(१) बृहन्मुंबई आणि बृहन्मुंबई उपनगर जिल्हे वगळता इतर सर्व जिल्हा प्राधिकरणांवर जिल्हा न्यायाधिशांव्यतिरिक्त खालीलप्रमाणे पदसिद्ध सदस्य असतील :—

(अ) जिल्हाधिकारी,
(ब) पोलीस आयुक्त (जर कोणत्याही जिल्ह्यामध्ये नेमणूक केली असेल);
(क) पोलीस अधीक्षक ;
(ड) मुख्य न्यायदंडाधिकारी ;
(ई) जिल्हा सरकारी वकील ;
(फ) सदस्य सचिव.

(२) शासन मुख्य न्यायमूर्तींशी विचारविनिमय करून ६ पेक्षा जास्त नसतील इतक्या सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्ती करू शकेल ज्यात किमान अर्धी संख्या या नियमाच्या पोट-नियम (३) मध्ये विहित केलेला अनुभव आणि पात्रता असलेल्या स्त्रियांची असेल

(३) कोणाही व्यक्तीची नामनिर्देशनाने जिल्हा विधी प्राधिकरणांवर नियुक्ती केली जाऊ शकेल जर अशी व्यक्ती—

(अ) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, स्त्रिया, मुले आणि नागरी कामगार किंवा ग्रामीण कामगार यांच्यासह समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीकरिता झटणारा नामांकित समाज कार्यकर्ता ; किंवा

(ब) कायद्याच्या क्षेत्रात तज्ज्ञ असलेली व्यक्ती ; किंवा

(क) विधी सेवा योजना राबविण्यामध्ये विशेष रस असणारी नामांकित व्यक्ती असेल

IndiaCode

(४) शासन मुख्य न्यायमूर्तींशी विचारविनिमय करून खालीलप्रमाणे पदसिद्ध सदस्यांचा समावेश असलेल्या बृहन्मुंबई विधी सेवा प्राधिकरण आणि बृहन्मुंबई उपनगर विधी सेवा प्राधिकरणाची स्थापना करील :—

(अ) बृहन्मुंबई विधी सेवा प्राधिकरण

(एक) मुख्य न्यायाधीश, शहर दिवाणी न्यायालय ;
(दोन) मुंबई शहराचा जिल्हाधिकारी ;
(तीन) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई ;
(चार) सरकारी वकील, शहर दिवाणी न्यायालय, मुंबई;
(पाच) मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई.

(ब) बृहन्मुंबई उपनगर विधी सेवा प्राधिकरण

(एक) मुख्य न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, मुंबई ;
(दोन) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर ;
(तीन) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई ;
(चार) अतिरिक्त/सहायक सरकारी वकील, शहर दिवाणी न्यायालय, मुंबई;
(पाच) मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई.

(५) शासन मुख्य न्यायमूर्तींशी विचारविनिमय करून ६ पेक्षा जास्त नसतील इतक्या सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्ती करू शकेल ज्यात किमान अर्धी संख्या या नियमाच्या पोट-नियम (३) मध्ये विहित केलेला अनुभव आणि पात्रता असलेल्या स्त्रियांसाठी असेल.

(६) प्रत्येक उच्च न्यायालय विधी सेवा समितीला आपआपल्या अंमलाखाली असलेल्या जिल्हा प्राधिकरणांवर सर्वसाधारण देखरेख ठेवण्याचे अधिकार असतील.

११. कलम ९ च्या पोट-कलम (५) अन्वये जिल्हा प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची संख्या :—नियम १२ च्या पोट-नियम (४) मधील परंतुकाच्या अधीन राहून जिल्हा प्राधिकरणावर अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे अधिकारी व कर्मचारी असतील

१२. कलम ९ च्या पोट-कलम (६) अन्वये जिल्हा प्राधिकरणावर असलेल्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती व वेतन आणि भत्ते :—

(१) जिल्हा प्राधिकरणावरील अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना राज्य शासनाच्या, समतुल्य पदावरील कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेले वेतन व भत्ते मिळण्याचा हक्क असेल.

(२) सेवानिवृत्तीचे वय, वेतन आणि भत्ते, लाभ व हक्क यांसारख्या सर्व बाबींमध्ये आणि शिस्तविषयक बाबींमध्ये जिल्हा विधी प्राधिकरणावरील अधिकारी आणि कर्मचारी राज्य शासनाच्या समतुल्य पदांवरील कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या राज्य शासकीय नियमांच्या अधीन असतील.

(३) जिल्हा विधी प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना आणि इतर कर्मचाऱ्यांना शासनाकडून वेळोवेळी अधिसूचित करण्यात येतील अशा सोयी, भत्ते आणि फायदे अनुज्ञेय होतील.

(४) जिल्हा समित्यांवर आणि बृहन्मुंबई कार्यकारिणीवरील सहाय्य व सल्ला समित्यांवर सध्या कार्यरत असलेले कर्मचारी, जसे की, लिपिक, शिपाई, सफाई कामगार आणि पहारेकरी यांना जिल्हा प्राधिकरणावर लिपिक-नि-टंकलेखक, शिपाई, सफाई कामगार आणि पहारेकरी या पदांवर अनुक्रमे समावेशनानंतर पात्रता ग्रहण करण्याच्या अटीवर सामावून घेतले जाईल.

IndiaCode

१३. कलम ११ अच्या पोट-कलम (२) च्या खंड (ब) अन्वये तालुका विधी सेवा समितीच्या सदस्यांची संख्या, अनुभव आणि पात्रता :—

(१) कलम ११अ च्या पोट-कलम (२) च्या खंड (अ) अन्वये नियुक्ती केलेल्या अध्यक्षांव्यतिरिक्त तालुका विधी सेवा समितीचे खालीलप्रमाणे पदसिद्ध सदस्य असतील :—

(एक) उप विभागीय पोलीस अधिकारी ;

(दोन) तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी नियुक्ती केली असल्यास त्यापैकी एक विधी अधिकारी;

(तीन) गट विकास अधिकारी.

(२) शासन मुख्य न्यायमूर्तीशी विचारविनिमय करून ४ पेक्षा अधिक नसतील इतक्या सदस्यांची नामनिर्देशनाने नियुक्ती करू शकेल, ज्यात किमान अर्धी संख्या या नियमाच्या पोट-नियम (३) मध्ये विहित केलेला अनुभव आणि पात्रता असलेल्या स्त्रियांची असेल.

(३) कोणाही व्यक्तीची नामनिर्देशनाने तालुका विधी सेवा समितीवर नियुक्ती केली जाऊ शकेल जर अशी व्यक्ती—

(अ) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, स्त्रिया, मुले आणि ग्रामीण कामगार ह्यांच्यासह समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीकरिता झटणारा नामांकित समाज कार्यकर्ती ; किंवा

(ब) कायद्याच्या क्षेत्रात तज्ज्ञ असलेली व्यक्ती ; किंवा

(क) विधी सेवा योजना राबविण्यामध्ये विशेष रस असणारी नामांकित व्यक्ती असेल.

(४) तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष विधी अधिकारी किंवा गटविकास अधिकारी ह्यांची नियुक्ती तालुका विधी सेवा समितीचे सचिव म्हणून करतील.

१४. कलम ११ अच्या पोट-कलम (३) अन्वये तालुका विधी सेवा समितीच्या अधिकाऱ्यांची व इतर कर्मचाऱ्यांची संख्या.—तालुका विधी सेवा समितीमध्ये अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येतील इतके अधिकारी व इतर कर्मचारी असतील.

१५. कलम ११ अच्या पोट-कलम (४) अन्वये तालुका विधी सेवा समितीवरील अधिकाऱ्यांच्या व इतर कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती आणि वेतन व भत्ते :—

(१) तालुका विधी सेवा समितीवरील अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना राज्य शासनाच्या समतुल्य पदावरील कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेले वेतन व भत्ते मिळण्याचा हक्क असेल.

(२) सेवानिवृत्तीचे वय, वेतन आणि भत्ते, लाभ व हक्क आणि शिस्तविषयक बाबींसहित सर्व बाबींमध्ये तालुका विधी सेवा समितीवरील अधिकारी आणि कर्मचारी राज्य शासनाच्या समतुल्य पदांवरील कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या राज्य शासनाच्या नियमांच्या अधीन असतील.

(३) तालुका विधी सेवा समितीवरील अधिकाऱ्यांना आणि इतर कर्मचाऱ्यांना शासनाकडून वेळोवेळी अधिसूचित करण्यात येतील, अशा सोयी, भत्ते आणि लाभ मिळण्याचा हक्क असेल

IndiaCode

१६. कलम १२ च्या खंड (ह) अन्वये विधी सेवांचा लाभ मिळण्याकरिता व्यक्तीचे वार्षिक कमाल उत्पन्न.—ज्यांचा खटला सर्वोच्च न्यायालयाव्यतिरिक्त इतर न्यायालयासमोर असेल आणि ज्यांचे सर्व साधनांपासून मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. २०,००० पेक्षा अधिक नसेल अशा कोणत्याही भारतीय नागरिकास या अधिनियमाच्या कलम १२ च्या खंड (ह) अन्वये विधी सेवा मिळण्याचा हक्क असेल.

१७. कलम १९ च्या पोट-कलम (४) मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तींव्यतिरिक्त लोकअदालतमधील इतर व्यक्तींचे अनुभव व पात्रता.—कोणीही व्यक्ती लोकअदालतच्या न्यायमंडळावर अंतर्भाव करण्यास पात्र असणार नाही जर अशी व्यक्ती,—

(अ) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, स्त्रिया, मुले, नागरी कामगार आणि ग्रामीण कामगार ह्यांच्यासह समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीकरिता झटणारा नामांकित (समाज) कार्यकर्ता, किंवा

(ब) वकिली क्षेत्रामध्ये तज्ञ असलेला वकील ; किंवा

(क) विधी सेवा योजना आणि कार्यक्रम अंमलात आणण्याकरिता विशेष रस असणारी नामांकित व्यक्ती नसेल.

१८. व्यावृत्ती.—महाराष्ट्र राज्य कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना, १९७९, महाराष्ट्र राज्य कायदेविषयक सहाय्य व सल्ला मंडळ, नियम, १९८१ आणि महाराष्ट्र राज्य कायदेविषयक सहाय्य व सल्ला मंडळ, विनियम, १९८१ मधील, वकिलांना देण्यात येणारे मानधन, नोंदवही व इतर नोंदी सुस्थितीत ठेवणे इत्यादींसारख्या कोणत्याही बाबींमधील ज्या तरतुदी हा अधिनियम किंवा हे नियम किंवा अधिनियमाच्या कलम २९अ अन्वये राज्य प्राधिकरणाकडून तयार करण्यात येतील अशा विनियमांच्या कोणत्याही तरतुदींशी विसंगत नसतील त्या तरतुदी हा अधिनियम, हे नियम किंवा यथास्थिती, विनियम यांन्वये दुसरी तरतूद होईपर्यंत योग्य त्या फेरफारांसह अंमलात राहतील.

IndiaCode

राज्य विधी सेवा प्राधिकरण

अनुसूची

[कृपया नियम ६, ७, ९(१) आणि (२), ११, १२ (१), १४ आणि १५(१) विचारात घेणे].

अनुक्रमांक (१)	पदाचे नाव (२)	वेतनश्रेणी (३)	आवश्यक पदे (४)	कार्याचे वर्णन (स्वरूप) (५)
		रुपये		
१	उप सचिव ..	.. ३,७००–१२५–४,७००–१५०–५,०००+ विशेष वेतन ५०० (विधी).	२	(१) राज्य, जिल्हा व तालुका प्राधिकरण यांचे प्रशासन (एक उप सचिव). (२) अर्थसंकल्प व अनुदान वितरण इत्यादी.
२	अवर सचिव	.. ३,०००–१००–३,५००–१२५–४,५०० (विधी विषयेतर).	२	(१) राज्य, जिल्हा व तालुका प्राधिकरण. यांचे प्रशासन (विधी विषयेतर). (२) अर्थसंकल्प व अनुदान वितरण इत्यादी.
३	कक्ष अधिकारी	.. २,०००–६०–२,३००–द.रो.–७५–३,२००–१००–३,५००.	२	(१) राज्य, जिल्हा व तालुका प्राधिकरण यांचे प्रशासन. (२) अर्थसंकल्प व अनुदान वितरण इत्यादी.
४	अधीक्षक (विधी)	.. २,३७५–७५–३,२००–द.रो.–१००–३,५००	१	(१) आवेदन व इतर निधिविषयक बाबी.
५	सहायक (विधी)	.. १,६४०–६०–२,६००–द.रो.–७५–२,९००	६	(१) (विधी) ५ (विधी विषयेतर)
६	रोख लेखापाल	.. १,६४०–६०–२,६००–द.रो.–७५–२,९०० +विशेष वेतन रु. १००.	१	
७	रोखपाल ..	.. ९५०–२०–१,१५०–द.रो.–२५–१,५००+ विशेष वेतन (रोख व्यवहाराबाबत).	१	

indiaCode

IndiaCode

(१)	(२)	(३)	(४)	(५)
		रुपये		
८	बिल लेखापाल	.. ९५०–२०–१,१५०–द.रो.–२५–१,५००+ विशेष वेतन रु. ६०.	६	
९	लिपिक-टंकलेखक	.. ९५०–२०–१,१५०–द.रो.–२५–१,५००	८	
१०	लघुलेखक (उच्चश्रेणी) (इंग्रजी).	२,०००–६०–२,३००–द.रो.–७५–३,२००	२	
११	लघुलेखक (उच्चश्रेणी) (मराठी).	२,०००–६०–२,३००–द.रो.–७५–३,२००	२	
१२	लघुलेखक (कनिष्ठ श्रेणी) (इंग्रजी).	.. १,६४०–६०–२,३००–द.रो.–७५–२,९००	१	
१३	लघुलेखक (कनिष्ठ श्रेणी) (मराठी).	१,६४०–६०–२,६००–द.रो.–७५–२,९००	२	
१४	शिपाई ..	.. ७५०–१२–८७०–द.रो.–१४–९४०	७	
१५	रोनिओ चालक	.. ७७५–१२–९५५–द.रो.–१५–१,०३०–२० १,१५०+विशेष वेतन रु. ३०.	१	
१६	झेरॉक्स यंत्रचालक	.. ७७५–१२–९५५–द.रो.–१५–१,०३०–२० १,१५०+विशेष वेतन रु. ३०.	१	
१७	वाहन चालक	.. ९५०–२०–१,१५०–द.रो.–२५–१,५००	२	

IndiaCode

IndiaCode

(१) बृहन्मुंबई जिल्हा विधी सेवा प्राधिकरण

(२) बृहन्मुंबई उपनगर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण

अनुसूची

[कृपया नियम ६, ७, ९(१) आणि (२), ११, १२(१), १४ आणि १५(१) विचारात घेणे.]

अनुक्रमांक	पदाचे नाव	वेतनश्रेणी	एकूण आवश्यक पदे	कायचि स्वरूप/वर्णन
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		रुपये		
१	अधीक्षक	१,६४०–६०–२,६००–इ.रो.–७५–२,९००	२	प्रशासकीय बाबी
२	लघुलेखक (कनिष्ठश्रेणी) (इंग्रजी, मराठी)	१,६४०–६०–२,६००–इ.रो.–७५–२,९००	४	
३	सहायक	१,२००–३०–१,५६०–इ.रो.–४०–२,०४०	४	
४	रोखपाल	९५०–२०–१,१५०–इ.रो.–२५–१,५००+ विशेष वेतन.	२	
५	लिपिक-नि-टंकलेखक ..	९५०–२०–१,१५०–इ.रो.–२५–१,५००	६	
६	शिपाई	७५०–१२–८७०–इ.रो.–१४–९४०	४	
७	पहारेकरी	७५०–१२–८७०–इ.रो.–१४–९४०	२	
८	वाहनचालक ..	९५०–२०–१,१५०–इ.रो.२५–१,५००	२	

ImpactCode

IndiaCode

उच्च न्यायालय विधी सेवा प्राधिकरण

अनुसूची

[कृपया नियम ६, ७, ९(१) व (२), ११, १२(१), १४ आणि १५(१) विचारात घेणे.]

अनुक्रमांक	पदाचे नाव	वेतनश्रेणी	एकूण आवश्यक पदे	कार्याचे स्वरूप/वर्णन
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		रुपये		
१	लघुलेखक (उच्चश्रेणी) (इंग्रजी).	.. २,०००–६०–२,३००–द.रो.–७५–३,२००	३	नियम ९० नुसार उच्च न्यायालय विधी सेवा प्राधिकरण हे मुंबई उच्च न्यायालय, मुंबई तसेच नागपूर व औरंगाबाद न्यायपीठ येथे असेल.
२	लघुलेखक (उच्चश्रेणी) (मराठी).	.. २,०००–६०–२,३००–द.रो.–७५–३,२००	३	
३	आस्थापना अधिकारी	.. २,०००–६०–२,३००–द.रो.–७५–३,५००	१	
४	सहायक ..	.. १,६४०–६०–२,६००–द.रो.–७५–२,९००	३	
५	लिपिक-नि-टंकलेखक	.. ९५०–२०–१,१५०–द.रो.–२५–१,५००	६	
६	शिपाई ..	.. ७५०–१२–८७०–द.रो.–१४–९४०	७	
७	वाहनचालक	.. ९५०–२०–१,१५०–द.रो.–२५–१,५००	४	

IndiaCode

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण

अनुसूची

[कृपया नियम ६, ७, ९(१) आणि (२), ११, १२(१), १४ व १५(१) विचारात घेणे.]

अनुक्रमांक	पदाचे नाव	वेतनश्रेणी	एकूण आवश्यक पदे	कार्याचे स्वरूप/वर्णन
(१)	(२)	(३)	(४)	(५)
		रुपये		
१	अधीक्षक ..	.. १,६४०–६०–२,६००–द.रो.–७५–२,९००	२९	प्रत्येक जिल्ह्यात एक अधीक्षक, दोन सहायक, दोन लिपिक-नि-टंकलेखक आणि तीन शिपाई असतील.
२	सहायक ..	.. १,२००–३०–१,५६०–द.रो.–४०–२,०४०	५८	
३	लिपिक-नि-टंकलेखक	.. ९५०–१,१५०–द.रो.–२५–१,५००	५८	
४	शिपाई ..	.. ७५०–१२–८७०–द.रो.–१४–९४०	८७	
		तालुका विधी सेवा प्राधिकरण		
१	सहायक ..	.. १,२००–३०–१,५६०–द.रो.–४०–२,०४०	३२२	
२	लिपिक-नि-टंकलेखक	.. ९५०–२०–१,१५०–द.रो.–२५–१,५००	६४४	
३	शिपाई ..	.. ७५०–१२–८७०–द.रो.–१४–९४०	३२२	

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

एस. के. शाह,
शासनाचे सचिव.

IndiaCode